सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर पोलीस भरती सन २०२२-२३ मधील शारीरिक चाचणीमध्ये उत्तीर्ण होवुन लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी १:१० प्रमाणातील उमेवारांची यादी या कार्यालयाचे https://aurangabadcitypolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे. सदर पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, या कार्यलयाचे संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेल्या यादीमध्ये लेखी पररिक्षेसाठी त्यांचे नावाची खातरजमा करावी व त्यांचे नावाचा समावेश असल्यास त्यांनी महाआयटी http://policerecrutment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर जावून हॉलटिकीट डाऊनलोड करुन घ्यावे. यादीतील नमुद उमेदवारांची लेखी परिक्षा ही दि.०७.७.२०२४ रोजी होणार आहे. लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी राहतील. लेखी परीक्षेस सकाळी ११.३० वाजता खालील नमुद ठिकाणी उपस्थित राहावे.

**राम नवले यांचे गुरुमाऊली वेअर हाऊस,**
**गट नं. १२९, करोडी टोकलनाका, ओम-साई हॉटेलचे मागे,**
**सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग-२११, छत्रपती संभाजीनगर.**

सर्व उमदेवारांना सकाळी ११.३० ते दुपारी ०२.०० वाजेपावेतो परिक्षा केद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल. दुपारी ०२.०० वाजेनंतर येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही याची उमदेवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन परिक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी **लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत प्रवेशपत्र, २ पासपोर्ट फोटो (मैदानी चाचणी करिता जे आणलेले होते तेच) व आवेदन अर्ज घेवुन यावे.**

इतर कोणतेही किंमती वस्तु कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये. सदरचे उपकरणे उमेदवारांजवळ आढळुन आल्यास त्यांना भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. तसेच त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.